कै. किशोर विठ्ठल कडू, मयत परिचर, पंचायत समिती
श्रीरामपूर यांचे दुय्यम सेवा पुस्तक तयार करणे बाबत....

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-१/आस्था-४ /४६४/२०२६
अहिल्यानगर दिनांक स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

**वाचा** - गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती श्रीरामपूर यांचेकडील पत्र क्र. आस्था-१/२५०/२०२६, दि.२४/०७/२०२६

ज्या अर्थी संदर्भीय पत्रान्वये कै किशोर विठ्ठल कडू, मयत परिचर, हे गटशिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती श्रीरामपूर येथे कार्यरत असतांना दिनांक ०८/०४/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. तरी कै. किशोर विठ्ठल कडू, मयत परिचर, पंचायत समिती श्रीरामपूर यांचे वारसदार यांना कुटुंब निवृत्ती वेतन प्रकरण मंजूर होणे आवश्यक आहे.

त्यानुसार मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी, मला प्रदान केलेल्या अधिकारान्वये असे आदेश देतो की, कै. किशोर विठ्ठल कडू, मयत परिचर, पंचायत समिती श्रीरामपूर, यांचे दुय्यम सेवापुस्तक गटविकास अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपूर, यांचे नियंत्रणाखाली आस्थापना लिपीक श्री जोशी अजित, वरिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग, पंचायत समिती श्रीरामपूर यांनी तयार करावे व सदर कामी श्री शिवाजी भिटे, सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपूर यांनी पर्यवेक्षण करावे.

तरी कै. किशोर विठ्ठल कडू, मयत परिचर, पंचायत समिती श्रीरामपूर हे ज्या ज्या कार्यालयात कार्यरत होते त्या कार्यालयाशी संपर्क करुन आवश्यक ते कागदपत्र, दस्तऐवज उपलब्ध करुन घेवून सदरचे दुय्यम सेवापुस्तक या आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्याचे कालावधीत तयार करावे.

सदर आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकतेस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. ---------20260823040155---------- असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 23-08-2026 16:08:02
आनंद भंडारी, (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. श्री शिवाजी भिटे, सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपूर

२. श्री अजित जोशी, वरिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग, पंचायत समिती श्रीरामपूर

व्दारा व प्रत — गटविकास अधिकारी, पं चायत समिती श्रीरामपूर

२/- सदरचा आदेश उपरोक्त संबंधित कर्मचारी यांना बजावुन त्याची पोहोच उलट टपाली या कार्यालयास सादर करावी.